फिल्मी कव्वालींचा सुरीला इतिहास

'आहे न भरे शिकवे न किये...' या *झीनत* चित्रपटातील पहिल्याच कव्वालीने चित्रपट कव्वालीला सुरुवात झाली. तिथून *धडकन*मधील 'दुल्हे का चेहरा...'पर्यंतच्या कव्वाली वाटचालीचा एक आढावा...

□ अजित पोपट



पर्दा है पर्दा...

बाराव्या शतकातील गोष्ट. ख्वाजा मोईद्दीन चिस्ती नावाचा सूफी संत इराक-इराण परिसरातून राजस्थानमधील अजमेर परिसरात आला. इथे आल्यावर त्याच्या कानावर परमेश्वराची संगीतमय आळवणी करणारी हिंदूंची भजन-कीर्तनं पडली. तसं पाहिलं तर मुसलमान धर्मात संगीत-गायन निषिद्ध समजलं जातं. तरीही सामान्यजनांना भक्तीमार्गाकडे नेण्यासाठी संगीत हे महत्त्वाचं माध्यम ठरू शकतं असं ख्वाजा मोईद्दिन चिस्तीना वाटलं. त्यांनी ठराविक लयीत टाळया वाजवून गायनाची एक विशिष्ट पद्धत शोधून काढली. यात *इश्के हकीकी* म्हणजे परमेश्वराची आराधना होती. असं म्हणतात की, तेव्हाच कव्वालीचा जन्म झाला.

ख्वाजा मोईद्दिन चिस्तींनंतर या कव्वालीचे सूर कायमचे गुंजत राहिले. तिला लोकाश्रय आणि राजाश्रय मिळाला. ती केवळ परमेश्वराच्या

आराधनेपुरती न राहता इतरही अनेक पैलू तिला लाभले. म्हणूनच काळाच्या ओघात संगीताच्या बदललेल्या स्वरूपातही ती टिकून राहिली.

परमेश्वराच्या उपासनेतून जन्माला आलेली हीच कव्वाली सगळ्यात बहारदार रूपाने सादर झाली ती हिंदी सिनेमात. प्रेमगीत, भजन-कीर्तन, देशभक्तीची गीतं यांच्याप्रमाणे कव्वालीलाही हिंदी सिनेमाने मानाचं स्थान दिलं. प्रेक्षकांना टाळ्यांचा ठेका धरायला लावणाऱ्या अनेक उत्तमोत्तम कव्वाली आजवर पडद्यावरून सादर झाल्यात. हे सिनेमातील कव्वाली दर्शन पाहून असंही म्हणता येईल की, फिल्म कव्वालींची एक वेगळीच रुपेरी परंपरा आहे.


फिल्मी कव्वालीचा विषय निघाल्यावर अनेकांना *अनारकली* चित्रपटातल्या 'तेरी महेफिल में किस्मत हम भी अजमायेंगे...' ही मशहूर कव्वाली आठवते. शहेजादा सलीमवर दासी बहार (निगारा सुलतान) आणि अनारकली (मधुबाला) दोघीही प्रेम करीत असतात. द्वेषभावनेतून एके दिवशी बहार शेरो-शायरीची स्पर्धा आयोजित करते. त्याच्यात बहार प्रेम एक निरर्थक गोष्ट असल्याचं म्हणते. प्रेमात पडणाऱ्यांना बरबादी-वाताहातीशिवाय दुसरं गत्यंतर नसतं असं तिचं म्हणणं असतं. याउलट प्रेमवेडी अनारकली प्रेमच माणसाला अमर करतं असा युक्तिवाद मांडत म्हणते, जग माझी आठवण ठेवणार असेल तर प्रेमात उद्ध्वस्त होण्यासाठी मी तयार आहे. हे द्वंद्व कव्वालीतून पेश करण्यात आलंय. ही कव्वाली आजही अनेकांना प्रेमविव्हळ अनुभव देते.

बुजुर्ग संगीतकार नौशाद म्हणतात, हिंदी चित्रपटात कव्वालीला प्रारंभ झाला १९४५मध्ये आलेल्या *झीनत* चित्रपटातून. यात नूरजहाँ याकूब आणि शशिकला हे कलावंत होते तर संगीत मीरसाहेबांचं होतं. 'आहे न भरे शिकवे न किये...' असा कव्वालीचा मुखडा होता. ही कव्वाली खूप लोकप्रिय झाली आणि सिनेनिर्माते या गायनप्रकाराकडे आकर्षित झाले. तरीही पुन्हा शुद्ध कवालीचा वापर खूप उशिराने झाला. बी. आर. चोप्राच्या *साधना* या चित्रपटात कव्वालीचं गीत होतं. परिस्थित
बनलेल्या एका दुर्दैवी स्त्रीची कथा यात होती. संगीतकार एन. दत्ता यांनी संगीतबद्ध केलेल्या कव्वालीचे बोल होते. 'आज क्यो हमसे पर्दा है...'



तेरी महेफिल में किस्मत अजमाके हम भी देखेंगे... *मुगल-ए-आजम*

या कव्वालीहून अधिक लोकप्रिय आणि अविस्मरणीय कव्वाली १९६०मध्ये *बरसात की रात* या चित्रपटात होती. तीन तुकड्यात तीन वेगवेगळ्या गीतांच्या रुपाने दहा ते बारा मिनिटांची ही कव्वाली पडद्यावर सादर झाली होती. ही कव्वाली चाल, लय आणि सादरीकरणाच्या दृष्टीने आजवरची सर्वोत्तम कव्वाली समजली जाते. तिचे शब्द होते, 'ना तो कारवा की तलाश है...' संगीतकार रोशनने खरं तर *घर घर में दिवाली* या चित्रपटासाठी १९६५मध्ये एक कव्वाली तयार केली होती. 'अगर अय दिल तू दिल लैला के गले का हार हो जाए...' परंतु या कव्वालीची फारशी दखल घेतली गेली नाही.



ना तो कारवा की तलाश है... - रोशन

बरसात की रात हा चित्रपट कव्वालीच्या जीवनाच्या कहाणीवरच बेतलेला होता. यातील 'ना तो कारवा की...' या कव्वालीनंतर पाकिस्तानमध्ये रोशनची वाहवा झाली. यातील शेवटचा भाग 'ये तो इश्क इश्क है, इश्क इश्क है...' तर बंदगी- प्रार्थनेच्या कव्वालीचा अजोड नमुना समजला जातो. रोशनने त्याच्या यशाचं श्रेय पाकिस्तानी मित्र फतेह अली खानला दिलं. मशहूर गायक नुसरत फतेह अली खान या फतेहअली खानचाच मुलगा.

*बरसात की रात*मधील कव्वालीला मिळालेला अफाट प्रतिसाद पाहून चित्रपटात कव्वाली ठेवायचं वेडच आलं. यातील काही कव्वाली चित्रपटाच्या कथेला पुढे नेणाऱ्या तर काही केवळ कथा लांबवणाऱ्या ठरल्या. काही तर निव्वळ हास्यास्पद होत्या. उदाहरणार्थ 'मेरे सामने

से इसको हटा दो...' धर्मेंद्रला रातोरात सुपरस्टार बनवणाऱ्या *फूल और पत्थर*तील ही कव्वाली होती. चित्रपटाचा निर्माता-दिग्दर्शक ओ. पी. रल्हनने चित्रपटात खिसेकापूची भूमिका केली होती. एकदा एका दणकट माणसाला आपला खिसा कापल्याचं लक्षात आल्यावर तो खिसेकापू ओ. पी.च्या पाठीशी लागतो. पळताना खिसेकापू एका हॉलमध्ये जाऊन वेषांतर केलेल्या सहकाऱ्यांना इशारा देऊन सांगतो, 'मेरे दिल के अंदर चलती है खंजर, मेरे सामने से इसको हटा दो...'

संगीतकार रोशनने *बरसात की रात*नंतरही काही चांगल्या कव्वाली सादर केल्या. १९६०मध्ये प्रदर्शित झालेल्या *बाबर*मधील कव्वाली हिट झाली होती. 'हसीनो के जलवे परेशान रहते अगर हम ना होते...' असे तिचे शब्द होते. रोशनच्या आणखी दोन यादगार कव्वाली *दिल ही दिल में*मध्ये होत्या. 'निगाहे उठाने को जी चाहता है...' आणि 'पडदा उठे सलाम हो जाये...'

कथेशी एकरूप होणाऱ्या कव्वाली सादर करण्यात नौशादही मागे नव्हते. *अनारकली*ची अजरामर कव्वाली ही नौशाद यांच्याच संगीताची करामत होती. या चित्रपटाच्या उत्तरार्धात आणखी एक कव्वालीसारखा प्रयोग आहे. शहेनशहा अकबर एका रात्रीसाठी हिंदुस्थानची मल्लिका बनवतो. अकबराची एकमेव अट असते की, अनारकलीने सलीमला सकाळ होण्यापूर्वी बेशुद्ध करावं अन्यथा तो म्हणतो... सलीम तुझे मरने नही देगा और हम तुम्हे जिने नहीं देंगे. अनारकली त्यावेळी एक तुच्छ कटाक्ष टाकून कव्वाली गाते: 'ये हुस्न भला क्या कम होगा... ये इश्क भला क्या कम होगा... जब रात ऐसी मतवाली फिर सुबह का आलम क्या होगा...' ही कव्वाली चित्रपटाच्या कहाणीला पुढे सरकवायचं काम करते.


जवळजवळ असाच प्रयोग १९६७मध्ये झळकलेल्या *पालकी* चित्रपटात नौशादने केला होता. कथा अशी की, नायक (राजेंद्रकुमार) मृत्युमुखी पडलाय असं



आहे न भरे शिकवे न किये... - नूरजहाँ



मैं इधर जाऊ या उधर जाऊ... - नौशाद



दूल्हे का चेहरा

- धडकन

समजून नायिका (वहिदा रहेमान) सहनायक (रहेमान)शी लग्न करते. लखनवी राहणीमानाच्या पार्श्वभूमीवर प्रणयत्रिकोणात नंतर नायक परतून कव्वाली गातो, 'मैं इधर जाऊ या उधर जाऊ, बडी मुश्किल हू मैं किधर जाऊ?' ही कव्वाली हिट ठरली होती.

अनेकदा कथेच्या दृष्टीने अनावश्यक असूनही स्वतंत्र गीत म्हणून कव्वाली हिट ठरल्याची उदाहरणं आहेत. १९५८मध्ये पडद्यावर आलेल्या *अलहिलाल* चित्रपटाचं नाव फार कमी जणांना ठाऊक असेल. त्याला बुलोसी राणीचं संगीत होतं. व्यावसायिक कव्वाल उस्ताद इस्माईल आझाद यांनी चित्रपटात कव्वाली सादर केली होती. 'हमे तो लूट लिया मिल के इश्क वालो ने...' ही कव्वाली आजही सिनेरसिकांत भरपूर लोकप्रिय आहे.

कव्वाली म्हणून सुपरहिट ठरलेल्या आणखी काही कव्वालींचा उल्लेख करावा लागेल. गुरुदत्तच्या *चौदवी का चांद*मध्ये आशा भोसले आणि शमशाद बेगम यांनी गायलेली 'शरमा के यू क्यू सब परदानशी आंचल को सवारा करते हो...' ही कव्वाली वहिदा रहेमानवर चित्रित केली होती. मनमोहन देसाईंच्या दोन फिल्मी कव्वालीदेखील इथे नमूद करायला हव्यात. दोन्ही कव्वाली *अमर अकबर ॲन्थनी* चित्रपटात होत्या. एक 'पर्दा है पर्दा...' आणि दुसरी 'शिर्डीवाले साईबाबा...' संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या दोन्ही कव्वाली हिट ठरल्या होत्या.

रुपेरी कव्वालीचा असा इतिहास. यातील काही कव्वाली पडद्यावर गाजल्या नसल्या हे खरं असली तरी हिट कव्वालींची संख्या त्यांच्यापेक्षा जास्तच आहे. अगदी *धडकन*या अलीकडे आलेल्या प्रणयत्रिकोणी चित्रपटातील 'दूल्हे का चेहरा...' ही कव्वालीदेखील हिट ठरलीय. याचा अर्थ आजच्या दणदणाटी संगीताच्या युगातही कव्वाली सिनेप्रेमींची मन जिंकण्याइतकी कर्णमधुर आहे. ●